पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

नॅक मुल्यांकनात ‘ब’ दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- 2023-2024

# समाजशास्त्र विभाग

प्राचार्य

डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख

प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## वार्षिक अहवाल 2023- 2024

## समाजशास्त्र विभाग

समाजशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2023- 2024 मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

**प्रवेश व तासिका प्रारंभ:**
समाजशास्त्र विषयाला शैक्षणिक वर्ष 2023 - 24 मध्ये प्रवेशित विद्यार्थी संख्या बीए प्रथम वर्ष 62, बीए द्वितीय वर्ष 27, बीए तृतीय वर्ष 12 आणि मुख्य विषय समाजशास्त्र 9 अशी होती. समाजशास्त्र विषयाच्या तासिका जूनच्या शेवटच्या आठवड्यात प्रारंभ झाल्या.

**कै. धुपाजी खोतकर पारितोषिक:**
महाविद्यालयात आयोजित गुणवंत सत्कार कार्यक्रमात दिनांक 22 जुलै 2023 रोजी कु. मयुरी भाऊसाहेब आढाव या विद्यार्थिनीने शैक्षणिक वर्ष 2022 - 2023 मध्ये समाजशास्त्र मुख्य विषयासह प्रथम क्रमांक पटकाविला, त्याबद्दल तिला कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. अशोक वाकोडकर (माजी प्राचार्य तथा समुपदेशक) यांच्या हस्ते कै. धुपाजी खोतकर पारितोषिक देण्यात आले. ज्यात 1750 रुपयाचा चेक व प्रमाणपत्र देण्यात आले.

**अतिथी व्याख्यान:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 1 सप्टेंबर 2023 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्त्या डॉ. सविता कांबळे (सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर) ह्या लाभल्या होत्या.
त्यांनी '**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक पुनर्निर्मान संकल्पना**' या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 1 सप्टेंबर 2023 रोजी **विद्यार्थी आत्महत्या** या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन डॉ. सविता कांबळे, प्रा.डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा.सुजाता कणके आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.

**नॅक पीअर टीमची विभागाला भेट:**
महाविद्यालयाचे मूल्यांकन करण्यासाठी नॅक पीअर टीम यांची भेट दिनांक 30 व 31 ऑक्टोबर 2024 रोजी झाली होती. नॅक अंतर्गत दिनांक 30 ऑक्टोबर 2024 रोजी नॅक पिअर टिम अध्यक्ष डॉ. जोसेफ डोराईराज तसेच समन्वयक डॉ.अमरेश कुमार व सदस्य डॉ. सत्येंद्रनाथ बुरमॅन यांनी समाजशास्त्र विभागाला भेट दिली व विभागाची पाहणी केली.

**डॉ. गोविंद घुर्ये यांची जयंती:**
समाजशास्त्र विभागाला डॉ. गोविंद घुर्ये यांचे नाव दिलेले असल्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त दिनांक 2 डिसेंबर 2023 रोजी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अभिवादनास डॉ. मंजुषा नळगीरकर आणि विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. गोविंद घुर्ये यांच्या समाजशास्त्रातील योगदानाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन अभिवादन कार्यक्रम:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित् दिनांक 6 डिसेंबर 2023 रोजी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभिवादनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला:**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी समाजशास्त्र विभागाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला मंजूर केली होती. ज्याला 10000 रुपये अनुदान मिळाले होते. ही व्याख्यानमाला दिनांक 4 जानेवारी 2024 रोजी घेण्यात आली. व्याख्यानमालेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रो. डॉ. वाल्मीक सरवदे हे लाभले होते. तर अध्यक्ष म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्री निवृत्ती गावंडे हे लाभले होते. सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे.

**अतिथी व्याख्यान:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 29 डिसेंबर 2023 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्त्या डॉ. दीपिका बनसोडे (सहाय्यक प्राध्यापिका, समाजशास्त्र विभाग सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर) ह्या लाभल्या होत्या. त्यांनी **कुटुंबाचे बदलते स्वरूप** या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 29 डिसेंबर 2023 रोजी **सोशल मीडिया** या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन डॉ. दीपिका बनसोडे, प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.

**अभ्यास सहल:**

समाजशास्त्र विषयातील गुन्हेगारी व गुन्हेगारी नियंत्रण या विषयाची माहिती विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे व्हावी म्हणून दिनांक 15 फेब्रुवारी 2024 रोजी फुलंब्री येथील पोलीस स्टेशन मध्ये समाजशास्त्र विभागाची अभ्यास सहल नेण्यात आली.

सदरील अभ्यास सहलीमध्ये पोलीस इन्स्पेक्टर श्री श्रीनिवास धुळे तसेच पोलीस निरीक्षक श्री संजय सहाने यांनी विद्यार्थ्यांना गुन्हेगारी म्हणजे काय तसेच गुन्हेगारी नियंत्रणामध्ये पोलीस यंत्रणा कशा पद्धतीने काम करते याविषयी सविस्तर माहिती दिली. गुन्ह्याची एफ आय आर नोंदणीपासून ते गुन्हेगाराला कोर्टात हजर करण्यापर्यंत सगळी प्रक्रिया कशी चालते याविषयी मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन मधील विविध विभाग तसेच तुरुंग हे देखील विद्यार्थ्यांना दाखविले. मागील काही वर्षात फुलंब्री तालुक्यात गुन्ह्याच्या खूप कमी केसेस आलेल्या आहेत असेही त्यांनी सांगितले. सदरील सहलीत 40 विद्यार्थी सहभागी झाले होते.

**गटचर्चा:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 11 मार्च 2024 रोजी **विधवा विवाह प्रासंगिकता** या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील गटचर्चेत 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सेमिनार:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 22 मार्च 2024 रोजी **भारतातील सामाजिक समस्या** या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदरील सेमिनारमध्ये 8 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सामाजिक सर्वेक्षण:**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व यशवंतराव चव्हाण कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,सिल्लोड यांच्या समाजशास्त्र विभागाच्या सामंजस्य करारांतर्गत ( MOU) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पोषण स्थितीचा अभ्यास (A study of nutritional status of college students) या विषयावरील ऑनलाइन सर्वेक्षण मार्च/ एप्रिल 2024 मध्ये घेण्यात आले. सदरील सर्वेक्षणात 180 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**पी.पी.टी तासिका:**
विभागाच्या वतीने अभ्यासक्रमाशी निगडित विविध विषयांवर 20 पी.पी.टी तासिका घेण्यात आल्या.

**प्रकल्प सादरीकरण:**
बी ए तृतीय वर्षाच्या मुख्य समाजशास्त्र विषय असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाचे सादरीकरण दिनांक 23 मार्च 2024 रोजी घेण्यात आले. त्यासाठी विद्यापीठाचे बाह्य परीक्षक म्हणून डॉ. राज पोपळघट समाजशास्त्र विभाग प्रमुख राजर्षी शाहू महाविद्यालय पाथरी हे लाभले होते. सात विद्यार्थ्यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले.

**सेंद्रिय शेती प्रमाणपत्र अभ्यासक्रम:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2023 24 मध्ये सेंद्रिय शेती प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. सदरील अभ्यासक्रमासाठी 10 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. सेंद्रिय शेती अभ्यासक्रमाचा तासिका 20 जानेवारी ते 23 मार्च 2024 या दरम्यान सोमवार, मंगळवार, शुक्रवार आणि शनिवार या दिवशी दुपारी 2.40 ते 3.30 या वेळेत घेण्यात आल्या. या अभ्यासक्रमा दरम्यान सेंद्रिय खते व कीटकनाशके कशी तयार करावीत या संदर्भात आपल्या महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉक्टर विजय खरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचा प्रकल्प प्रत्यक्ष पाहता यावा म्हणून  फुलंब्री येथे चालविल्या जाणाऱ्या प्रथम ओपन स्कूल मधील सेंद्रिय शेतीचे तयार केलेले मॉडेल दाखविण्यासाठी विद्यार्थ्यांना दिनांक 5 मार्च 2024 रोजी भेटीसाठी नेण्यात आले. प्रकल्प भेटीदरम्यान प्रथम ओपन स्कूल सेंटरचे हेड श्री अमोल थोरात तसेच सेंटरच्या समन्वयक कु. पल्लवी शेजवळ यांनी सेंद्रिय शेती किती महत्त्वाची आहे या संदर्भातील काही व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविले. त्यानंतर प्रत्यक्ष सेंद्रिय पद्धतीने तयार केलेल्या शेतीचा प्रोजेक्ट विद्यार्थ्यांनी पाहिला. ज्यामध्ये भाजीपाला शेती, फळबाग शेती, धान्य शेती व फुल शेती सेंद्रिय पद्धतीने कशी केली जाते तसेच रोपवाटिका व सीड बँक कशी तयार करायची याविषयी श्री.अमोल थोरात यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळे व प्रकल्प भेटीमुळे विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्व कळायला मदत झाली.
सदरील अभ्यासक्रमावरील परीक्षा दिनांक 23 मार्च 2024 रोजी घेण्यात आली. ज्यात 25 गुणांची बहुपर्यायी प्रश्नावली, 15 गुणांचे प्रात्यक्षिक आणि 10 गुणांची तोंडी परीक्षा होती. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना घरून सेंद्रिय खत किंवा सेंद्रिय कीटकनाशक तयार करून आणायला सांगितले होते. सदरील परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम क्रमांक कु. आरती गवनाजी केजभट, द्वितीय क्रमांक कु. आकांक्षा रघुनाथ शेवाळे आणि तृतीय क्रमांक कु. निकिता संतोष सिहरे आणि कु. साक्षी बबन पोफळे यांनी मिळविला.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

## समाजशास्त्र विभाग

## कार्यक्रमाची छायाचित्रे

### अतिथी व्याख्यान



दिनांक 1 सप्टेंबर 2023 रोजी डॉ. सविता कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक पुनर्निर्मान संकल्पना' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



दिनांक 29 डिसेंबर 2023 रोजी डॉ. दीपिका बनसोडे यांनी कुटुंबाचे बदलते स्वरूप

या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# <u>भित्तीपत्रक प्रकाशन</u>




दिनांक 1 सप्टेंबर 2023 रोजी विद्यार्थी आत्महत्या या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना डॉ. सविता कांबळे



दिनांक 29 डिसेंबर 2023 रोजी सोशल मीडिया **या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना** डॉ. दीपिका बनसोडे

## गटचर्चा




दिनांक 11 मार्च 2024 विषय: विधवा विवाह प्रासंगिकता

## सेमिनार




दिनांक 22 मार्च 2024  विषय: भारतातील सामाजिक समस्या

# <u>अभ्यास सहल</u>

समाजशास्त्र विषयातील गुन्हेगारी व गुन्हेगारी नियंत्रण या विषयाची माहिती विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे व्हावी म्हणून दिनांक 15 फेब्रुवारी 2024 रोजी फुलंब्री येथील पोलीस स्टेशन मध्ये समाजशास्त्र विभागाची अभ्यास सहल नेण्यात आली.

सदरील अभ्यास सहलीमध्ये पोलीस इन्स्पेक्टर श्री श्रीनिवास धुळे तसेच पोलीस निरीक्षक श्री संजय सहाने यांनी विद्यार्थ्यांना गुन्हेगारी म्हणजे काय तसेच गुन्हेगारी नियंत्रणामध्ये पोलीस यंत्रणा कशा पद्धतीने काम करते याविषयी सविस्तर माहिती दिली. गुन्ह्याची एफ आय आर नोंदणीपासून ते गुन्हेगाराला कोर्टात हजर करण्यापर्यंत सगळी प्रक्रिया कशी चालते याविषयी मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन मधील विविध विभाग तसेच तुरुंग हे देखील विद्यार्थ्यांना दाखविले. मागील काही वर्षात फुलंब्री तालुक्यात गुन्ह्याच्या खूप कमी केसेस आलेल्या आहेत असेही त्यांनी सांगितले. सदरील सहलीत 40 विद्यार्थी सहभागी झाले होते.






**पोलीस इन्स्पेक्टर श्री श्रीनिवास धुळे मार्गदर्शन करताना**

**पोलीस निरीक्षक श्री संजय सहाने मार्गदर्शन करताना**



# डॉ. गोविंद घुर्ये यांची जयंती





2 डिसेंबर 2023 रोजी डॉ. गोविंद घुर्ये यांच्या विषयी माहिती देताना डॉ. मंजुषा नळगीरकर व अभिवादन



पी.पी.टी तासिका



प्रकल्प सादरीकरण

ऑनलाइन सामाजिक सर्वेक्षण



## सेंद्रिय शेती प्रमाणपत्र अभ्यासक्रम फोटो 2023-2024



सेंद्रिय शेती विषयीची माहिती पीपीटी प्रेझेंटेशन द्वारे दाखविताना प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर



गांडूळ खत निर्मिती बद्दल माहिती देत असताना डॉ. विजय खरात

सेंद्रिय शेती प्रकल्प भेट दिनांक 5 मार्च 2024



सेंद्रिय शेतीचे महत्व व्हिडिओद्वारे दाखवत असताना प्रथम संस्थेच्या कु.पल्लवी शेजवळ



सेंद्रिय शेतीच्या प्रकल्पाविषयी माहिती देत असताना प्रथम संस्थेचे श्री अमोल थोरात



प्रकल्प पहात असताना विद्यार्थी




सेंद्रिय शेती अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण